# महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)

निर्मल, ५ वा मजला, नरिमन पॉईन्ट, बॅकबे रिक्लमेशन, मुंबई -४०० ०२१.

महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) हे खालील पदाकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी राज्य शासनाच्या सेवेमध्ये संशोधन अधिकारी या पदावर कार्यरत असलेले व प्रतिनियुक्तीकरीता पात्र असलेल्या अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावयाची पदे** | **अर्जदाराच्या वेतनश्रेणीचा तपशिल (सातव्या वेतन आयोगाप्रमाणे)** |
|---|---|---|---|
| १. | संशोधन अधिकारी | १० | एस-१५ ४१८००-१३२३०० |

उपरोक्त वेतनश्रेणीमध्ये राज्य शासनाच्या सेवेमध्ये संशोधन अधिकारी या पदावर कार्यरत असलेले व प्रतिनियुक्ती करीता पात्र असलेले अधिकारी यांनी विहीत नमुन्यात अर्ज सादर करावेत. प्रतिनियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दि. १७/१२/२०१६ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/कार्या. १२, दि. १६/०२/२०१८ व श्रृंखलेतील वेळोवेळी जाहिर केलेले शासन निर्णय या नुसार राहतील. अर्जाचा विहीत नमुना महाराष्ट्र शासनाच्या https://maharashtra.gov.in संकेतस्थळावर व मित्र कार्यालयाच्या https://mahamitra.org संकेतस्थळावर अपलोड केलेला आहे. तरी ईच्छुक अधिकाऱ्यांनी अर्ज मित्र कार्यालयाच्या admin-mitra@mah.gov.in या पत्त्यावर / ईमेल वर सादर करावेत.

विहीत अर्ज सादर करण्याची मुदत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवस राहील. (दिनांक १०/१०/२०२४ ते दिनांक ३०/१०/२०२४ पर्यंत संध्याकाळी ६.१५ वाजेपर्यंत)

मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र)

**महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) कार्यालयात संशोधन अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरणेसाठीच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :**

१. प्रतिनियुक्ती प्रथमत: ३ वर्षाकरीता करण्यात येईल व संबंधित अधिकाऱ्याची ईच्छुकता व नियंत्रण विभागाचे आवश्यकतेनुसार दिलेला कालावधी कमाल ५ वर्षापर्यंत वाढविता येईल. विहीत केलेला कालावधी संपताच प्रतिनियुक्ती आपोआप संपुष्टात येईल व सदरचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

२. संशोधन अधिकारी (एस-१५ ४१८००-१३२३००) या वेतनश्रेणीत असलेले राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेले कोणत्याही विभागातील अधिकारी अर्ज करू शकतील.

३. प्रतिनियुक्तीवर पदस्थापनेसाठी पदग्रहण अवधी हा शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार अनुज्ञेय राहील.

४. मित्र कार्यालयास काही विशिष्ट कारणास्तव विहित कालावधी संपण्यापूर्वी प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यास त्याच्या मूळ प्रशासकीय विभागास / कार्यालयाकडे परत पाठविणे आवश्यक असल्यास, तसे समर्थनीय कारण स्पष्ट करून त्याला / तिला परत पाठविण्यासाठी यथास्थिती संबंधित प्रशासकीय विभागास / कार्यालयास तीन महिन्याची पूर्वसूचना (नोटिस) देऊन या संदर्भात विशिष्ट कारणे नमूद करून उदा. अनियमितता, अफरातफर, कर्तव्यच्युती इ. कारणे नमूद करून प्रतिनियुक्तीचा कालावधी तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

५. आदेशात विहीत केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच अधिकारी स्वत:हून मूळ प्रशासकीय विभागात / कार्यालयात परत जाण्यास ईच्छुक असल्यास त्याने समर्थनीय कारण स्पष्ट करून त्यासाठी किमान तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटिस) यथास्थिती दोन्ही प्रशासकीय विभागास / कार्यालयास देणे आवश्यक राहील. अशा परिस्थितीत त्याच्या विनंतीवरून प्रतिनियुक्ती संपुष्टात आणण्याचा निर्णय प्रतिनियुक्तीच्या आस्थापनेवरील कार्यालयातील सक्षम प्राधिकारी घेतील, सदर अधिकाऱ्याच्या पूर्ण सेवाकाळात अनुज्ञेय एकूण १० वर्षाच्या प्रतिनियुक्ती कालावधीतून आदेशात विहीत केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी त्याने उपभोगल्याचे समजण्यात येईल.

६. ज्या अधिकारी यांच्या विरूध्दात भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरणे, फौजदारी प्रकरणे / महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरू आहे अथवा शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे त्यांनी अर्ज करू नयेत.

७. अर्ज सादर करण्याची मुदत जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवस राहील. (दिनांक १०/१०/२०२४ ते दिनांक ३०/१०/२०२४ पर्यंत संध्याकाळी ६.१५ वाजेपर्यंत)

८. ईच्छूक अधिकारी जाहिरातीत नमूद केलेल्या विहीत मुदतीत अर्ज सादर करू शकतील. तसेच त्याबाबतची हार्ड कॉपी मित्र कार्यालयाकडे पाठविण्यात यावी.

प्रतिनियुक्तीकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन १२, दि. १७/१२/२०१६ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१६/ प्र.क्र.५१०/कार्या. १२, दि. १६/०२/२०१८ व श्रृंखलेतील वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

**प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी करावयाचा अर्जाचा नमुना (प्रपत्र १)**

| अ.क्र. | मुद्दा | तपशिल / अभिप्राय |
|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | |
| २ | कार्यालयाचे नाव | |
| ३ | पद व वेतनश्रेणी - सातव्या वेतन आयोगाप्रमाणे | |
| ४ | जन्म दिनांक | |
| ५ | शैक्षणिक अर्हता | |
| ६ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७ | सध्याचे पद व त्यावरील नियुक्तीचा दिनांक | |
| ८ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ९ | मागील ३ वर्षाचे गोपनीय अहवालाच्या प्रती | |
| १० | मत्ता व दायित्व सादर केलेली आहे का? | |
| ११ | पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात आहे का? | |
| १२ | वयाच्या ५०/५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का? (लागू असल्यास) | |
| १३ | मागील वेळी प्रतिनियुक्ती करण्यात आली किंवा कसे याचा तपशिल | |
| १४ | विभागीय चौकशी प्रस्तावित आहे किंवा कसे याचा तपशिल | |
| १५ | प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे? | |